तातडीचे.

जा.क्र. माध्य-३(१४)/नमाशा/मान्यता/पुवि/९२
शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग,
पुणे - १. यांचे कार्यालय.
दिनांक :- १५/१०/१९९२

प्रति,

सचिव,

मोर्दे ... कृषी औद्योगिक संस्था
पुणे ...............

विषय :- सन १९९२-९३ या शैक्षणिक वर्षात नविन माध्यमिक शाळांना परवानगी देण्याबाबत....

संदर्भ :- मा. अवर सचिव, शालेय शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई-३२ यांचे पत्र क्र. एसएसएन १०९२/३१३३/माशि-१ दि. १६ सप्टें. १९९२

शासनाने संदर्भीय पत्रान्वये आपल्या संस्थेला नवीन माध्यमिक शाळा परवानगी देण्यावर शासनाने घातलेल्या सर्वसाधारण बंदीला अपवाद करून खालील दर्शविलेल्या ठिकाणी इयत्ता ८ माध्यमातून जून १९९२ पासून विना अनुदान तत्वावर/कायम विनाअनुदान तत्वावर "विशेष बाब" म्हणून नवीन माध्यमिक शाळा, माध्यमिक शाळा संहितेनुसार आवश्यक असणाऱ्या सर्व बाबींची तसेच खाली नमूद केलेल्या अटींची पुर्तता करण्याच्या शर्तीवरच परवानगी देण्यात येत आहे.

[१] संबंधित संस्थांना सन १९९१-९२ या वर्षापासून जरी परवानगी देण्यात येत असली तरी सदरची परवानगी सन १९९२-९३ हे शैक्षणिक वर्ष सुरु झाल्यानंतर देण्यात येत असल्यामुळे या संस्थांनी संबंधित शाळांना [इंग्रजी माध्यमाच्या शाळा वगळून] संबंधित विभागीय शिक्षण उपसंचालकांची ... ... मिळाल्यानंतर, सन १९९३-९४ या वर्षात तदर्थ अनुदानासाठी पात्र समजण्यात येईल.

[२] या नवीन माध्यमिक शाळांना [इंग्रजी माध्यमा व्यतिरिक्त] शासन निर्णय, शिक्षण व सेवायोजन विभाग क्र. एसएसएन १०८८/१६६९-ऐन माशि-१ दि. १०.२.८९ अन्वये विहित केलेल्या नवीन सुत्रानुसार अनुदान अनुज्ञेय होईल.

[३] सदर माध्यमिक शाळांनी शासनाच्या वेळोवेळी निघणाऱ्या आदेशांचे [ उदा. विद्यार्थ्यांच्या प्रवेशाबाबत इ. ] काटेकोरपणे पालन करणे आवश्यक आहे.

[४] सदर संस्थांची आर्थिक स्थिती पुरेशी समाधानकारक असणे आवश्यक आहे.

TRUE COPY

HEAD MASTER

TRUE COPY

मुख्याध्यापक
गणाजी मालुसरे माध्यमिक व उच्च माध्य. विद्यालय ... ता वेल्हे जि पुणे

Scanned with OKEN Scanner